# आजपासून विसा रॅलीचा थरार

नाशिक (वार्ताहर)- वेस्टर्न इंडिया स्पोर्टस् असोसिएशन (विसा) तर्फे आयोजित रॅली ऑफ महाराष्ट्राचे पहिले चरण आज (दि. ३) रोजी फाळके स्मारक येथे पार पडणार आहे.

या रॅलीमध्ये यावर्षी प्रथमच महाराष्ट्रातील स्पर्धकांच्या आठ जोड्या सहभागी होणार आहेत. त्यात औरंगाबाद, मुंबई, पुणे येथील स्पर्धकांचा सहभाग आहे. गुजरातमधून दोन स्पर्धक सहभागी होत आहेत. स्पर्धेत एकूण २९ स्पर्धक सहभागी होणार आहेत. त्यात आंतरराष्ट्रीय कीर्तीचा एन.आय.एफ. पुरस्कृत गौरव गिल, राहुल कंथराज यांचा समावेश आहे.

आज (दि. ३) सायंकाळी ४.४० वाजता खास नाशिकरांसाठी फाळके स्मारक येथे स्पर्धेची पहिली फेरी होणार आहे. संपूर्ण स्पर्धेतील ही सर्वात वेगवान स्टेज आहे. त्यामुळे या स्पर्धेतील थरार नागरिकांना बघावयास मिळणार आहे.

पूर्ण स्पर्धेतील घडामोडी 'रेड-एफएम' कथन करणार आहे. 'रेड-एफएम'चे आरजे नाशिककरांना अनुभव, वातावरण, स्पर्धकांचे म्हणणे, दर्शकांचे अभिप्राय या सर्व गोष्टी शेअर करणार आहेत.



## शिरीष चंद्रन यांच्या कामगिरीवर लक्ष

नाशिक (वार्ताहर)- वेस्टर्न इंडिया स्पोर्टस् असोसिएशन (विसा)तर्फे आयोजित रॅली ऑफ महाराष्ट्रमध्ये ओव्हर ड्राईव्ह या मासिकाचे संपादक शिरीष चंद्रन हे मित्सुबीशीच्या सिडीया या गाडीसह सहभागी होणार असल्याची माहिती फ्युचर कार्सतर्फे काल पत्रकार परिषदेत देण्यात आली.

मित्सुबीशी सिडीया स्पोर्टस् या गाडीने ज्या स्पर्धेत भाग घेतला त्यात देदिप्यमान विजय मिळवला आहे. विसातर्फे दि. ३ ते ५ जून दरम्यान होणाऱ्या स्पीड इंडियन नॅशनल रॅली चॅम्पियनशीपमध्येही सिडीया गाडी आपले मागील रेकॉर्ड मागे ठेवत नवीन रेकॉर्ड प्रस्थापित करेल, असा विश्वासही व्यक्त करीत ओव्हर ड्राईव्ह या मोटर स्पोर्टस् मासिकाचे संपादक शिरीष चंद्रन हे स्पर्धेत भाग घेऊन ही गाडी चालवणार असल्याचे सांगितले.

यावेळी बोलताना शिरीष चंद्रन म्हणाले, या स्पर्धेत भाग घ्यायचे ठरवले, त्यावेळी मित्सुबीशीच्या सिडीया स्पोर्टस् या गाडीशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. कारण या गाडीचा लौकिकच तसा आहे. त्यामुळेच ही गाडी आपल्या देशातील सर्वोत्कृष्ट रॅलीकार म्हणून ओळखी जाते. २०१० साली पदार्पणाच्या स्पर्धेतच या गाडीमुळे मी 'पोडियम फिनिशर्स'चा बहुमान मिळवू शकलो, असे त्यांनी सांगितले. नाशकातील स्पर्धा ही अत्यंत चांगल्या पद्धतीने होते. येथील स्पर्धेचे आयोजन करण्याची पद्धत कौतुकास्पद आहे. या आयोजनाची इतर ठिकाणीही प्रशंसा होत असते. नाशकातील स्पर्धेतील रस्ते आव्हानात्मक आहेत. हे आव्हान स्वीकारताना नेहमी आनंद वाटतो, असेही चंद्रन यांनी नमूद केले. या पत्रकार परिषदेस तलवारे बिल्डर्सचे अशोक तलवारे, निशांत ठक्कर, रूपेश रागवान, नारायणन, सुमित आदी उपस्थित होते.